महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# !!प्रकटन!!

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी)परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर सोमवार दिनांक १२/०१/२०२६ पासून **Admit Card** या **link** व्दारे **download** करण्याकरिता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे(Hall Ticket)प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना **"Paid"** असे **Status** प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे **"Paid Status Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व **Extra Seat No.** विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे **"Extra Seat No Admit Card"** या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. **Download** केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या **Online** पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता **Application Correction** ही **Link** उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर **"Correction Admit Card "** या **Link** व्दारे सुधारीत **Admit Card** उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६. ज्या आवेदनपत्रांना **"Paid "** असे **Status** प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे **Status Update** होवून **"Late Paid Status Admit Card"** या **Option** व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : ०९/०१/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

G:\Exam-7-2026\Hall Ticket 2026.docx-5

पृष्ठांकन क्र.अविमं/उमाप/ 3501
दिनांक :- १२/०१/२०२६

प्रति,

**प्राचार्य /मुख्याध्यापक**
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय :- फेब्रुवारी / मार्च 2026 च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत** (Hall Ticket)... APAAR ID नोंदवून घेणेबाबात..

**संदर्भ :-** रा.मं.पुणे यांचे पत्र क्र.रा.मं./ **परीक्षा – ७/९२,दिनांक ०९/०१/२०२६.**

**उपरोक्त पत्राचे अवलोकन करण्यात येवून आवश्यक ती योग्य कार्यवाही करण्यात यावी**

(संगीता साळुंखे)
विभागीय सहा.सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती